# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक

**विषय : आर्थिक वर्ष २०२०-२१ च्या अंतरिम अर्थसंकल्पाबाबत....**

दि. १४ मार्च २०२० रोजी नियोजित केलेली वार्षिक अधिसभा ही सध्या पसरलेल्या COVID-19 विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावामूळे संस्थगित करण्यात आली. तसेच देशव्यापी लॉकडाऊनमुळे वार्षिक अर्थसंकल्प २०२०-२१ अधिसभेमध्ये सादर होवू शकला नाही.

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी एकूण अर्थसंकल्पाच्या २५ टक्के लेखा अनुदान मान्य करण्यात आले. त्यानुसार या परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागप्रमुख व प्रशासकीय शाखाप्रमुख यांना कळविण्यात येते की, आपल्या विभागाच्या/प्रशासकीय शाखेच्या एकूण मंजूर अर्थसंकल्पाच्या २५ टक्के इतकीच अर्थतरतुद पुढील अधिसभा होईपर्यंत अथवा ३० जून, २०२० पर्यंत (यापैकी जे आधी घडेल ते) वापरता येईल.

विद्यापीठातील सर्व विभागप्रमुख व प्रशासकीय शाखाप्रमुख, केंद्रित व विकेंद्रित वित्तशाखा प्रमुख व इतर संबंधितांनी वरील बदलाची नोंद घेवून आपल्या विभागाचे आर्थिक प्रस्ताव सादर करावे. **सदर बदलाचे बंधन विचारात घेऊन आर्थिक प्रस्ताव पाठविण्याबाबत वित्त व लेखा विभागास सहकार्य करावे, ही विनंती.**

सीए अतुल पाटणकर
वित्त व लेखा अधिकारी

गणेशखिंड, पुणे ४११००७
जा.क्र.वित्त/अर्थसंकल्प/२०२०-२१/२०८५
दिनांक : ०१ जून, २०२०

**प्रत कार्यवाहीसाठी-** १) मा. विभागप्रमुख,
२) मा. प्रशासकीय शाखाप्रमुख
३) केंद्रित व विकेंद्रित वित्तशाखा प्रमुख

**प्रत माहितीसाठी-** १) मा. कुलगुरु
२) मा. प्र-कुलगुरु
३) मा. कुलसचिव

D:\Dr.Bhagwat\Budget other papers/paripatrak